लोकमत ५.५१.२०१

# 'खो-खो'च्या वादातून दमदाटी, मारहाण

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड:** मीरारोडच्या गोल्डन नेस्ट समोरील सर्वोदय कॉम्प्लेक्समध्ये खेळण्याच्या वादावरून राडा झाला. नया नगर पोलिसांनी दोन्ही बाजूच्या फिर्यादीनुसार परस्पर विरोधी गुन्हे दाखल केले आहेत.

सर्वोदय संकुलातील श्रीलाभ इमारतीत राहणाऱ्या भावेश गुप्ता (१९) आणि त्याच संकुलातील श्रीसिद्धी इमारतीत राहणारा अमित मोरया (२५), साईशुभमध्ये राहणारा नील मकवाना (२३) तसेच संजय मकवाना, नीता मकवाना आणि विनीत पांचाल (२३) यांच्यात २८ एप्रिल रोजी वाद झाला. भावेशच्या फिर्यादीनुसार खो-खो खेळण्याच्या वादातून झालेल्या भांडणात अमित, निल, संजय, नीता व विनीत या पाच जणांनी भावेश याला शिवीगाळ, दमदाटी आणि मारहाण केली. तसेच भावेशच्या छातीला चावा घेऊन दुखापत केली म्हणून नया नगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. तर, विनीतच्या फिर्यादीनुसार, भावेश आणि त्यांच्यात खो-खो खेळण्यावरून भांडण झाले असता भावेशने लाकडी दांडक्याने डोक्याच्या मागे मारून विनीतला जखमी केले. विनीतच्या फिर्यादीनुसार पोलिसांनी भावेशवरही गुन्हा दाखल केला आहे. सहायक पोलिस निरीक्षक संदीप दिवटे हे गुन्ह्यांचा तपास करत आहेत.

# तरुणीचा विनयभंग



**मीरा रोड :** मीरा रोडच्या हरिया ड्रीम पार्क भागात राहणाऱ्या १८ वर्षीय तरुणीचा इंद्रलोक फेस ६, बेव्हर्ली हाइट्स-कनकिया डेव्हलपर्सजवळ दुचाकीवरून जाणाऱ्या तिघांनी पाठलाग केला. तर एकाने तिच्याशी अश्लील वर्तन करून विनयभंग केला. तसेच तिला अश्लील इशारे करत शिवीगाळ केली व ऑफिसबाहेर निघ, बघून घेतो, अशी धमकी दिली. याप्रकरणी २९ एप्रिल रोजी नवघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक संजय लोखंडेमाळी तपास करीत आहेत.

# घरातून ६ लाखांचे ब्रेसलेट पळविले

**मीरा रोड :** मीरारोडच्या विनयनगर येथील अपना घर फेस २ मध्ये राहणारे वीरन ठुमर (३८) हे घरातील बेडरूममध्ये झोपले होते. त्यांनी गादीच्या बाजूला काढून ठेवलेले त्यांचे सोन्याचे १३ तोळ्यांचे ६ लाख २४ हजार रुपयांचे ब्रेसलेट चोरीला गेले आहे. काशिगाव पोलिसांनी २९ एप्रिल रोजी याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. पोलिस उपनिरीक्षक भगवान पालवे हे तपास करत आहेत.

# धूमस्टाईलने मंगळसूत्र चोरले

**मीरा रोड :** मीरा रोडच्या आकृती हबटाऊन गार्डेनियामध्ये राहणाऱ्या रवीना सिद्धार्थ गडगे यांचे ३ तोळ्यांचे सोन्याचे मंगळसूत्र दुचाकीचालकाने धूम स्टाईलने चोरी करून नेले. जीसीसी क्लब ते वेलकर पेट्रोल पंप दरम्यान ही घटना घडली. या प्रकरणी २९ एप्रिलच्या रात्री काशिगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक विजय साठे तपास करत आहेत.

# विरारमध्ये दुचाकी चोरीला

**नालासोपारा :** विराटनगरच्या न्यू ऋषीकेश अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या तुषार दारुवाला (५९) यांची १८ हजार रुपये किमतीची दुचाकी चोरीला गेली आहे. रविवारी रात्री इमारतीच्या दुकानासमोर पार्किंग केलेली दुचाकी चोरट्याने चोरून नेली आहे. विरार पोलिसांनी सोमवारी वाहनचोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

CamScanner

लोकसत्ता पृ. पान. १०।

# सफाई कर्मचाऱ्यांच्या मृत्यूला ठेकेदार जबाबदार

## राष्ट्रीय सफाई आयोगाकडून कारवाईचे निर्देश

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**प्रत्येक मृतांच्या वारसांना ३० लाखांची मदत**

मृत्यू झालेल्या चार जणांच्या वारसांना पॉलीकॉम या कंपनीच्या ठेकेदारांकडून प्रत्येक कुटुंबाला ३० लाख रुपयांची मदत दिली जाणार आहे. शुक्रवारी सुरुवातीला या वारसांना पाच लाख रुपयांचे धनादेश दिले जाणार आहेत. उर्वरित रक्कम ही २० मेपर्यंत पूर्ण करण्यात यावी, असे आदेश आयोगाने दिले आहे. शिवाय मुलाचे शिक्षण व इतर काही योजनांचाही लाभ यांना द्यावा, असेही या बैठकीत सांगण्यात आले आहे.

**वसई:** विरारच्या ग्लोबल सिटी सांडपाणी प्रकल्पात चार कामगारांचा मृत्यू झाला होता. ही घटना निष्काळजीपणामुळे घडल्याने याप्रकरणी ठेकेदारावर कडक कारवाईचे तसेच प्रत्येक मृताच्या वारसांना कंपनीने ३० लाख रुपये नुकसानभरपाई देण्याचेही निर्देश आयोगाच्या अध्यक्षांनी दिले आहेत.

विरार पश्चिमेच्या ग्लोबल सिटी येथे सांडपाणी प्रकल्प आहे. येथील टाक्या २५ ते ३० फूट खोल आहेत. ९ एप्रिल रोजी शुभम पारकर (२८), अमोल घाटाळ (२७), निखिल घाटाळ (२४) आणि सागर तेंडुलकर (२९) असे चार जण साफसफाई करण्यासाठी टाक्यांत उतरले होते. त्यात त्यांचा गुदमरून मृत्यू झाला. मंगळवारी नवी दिल्ली येथून राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष एम. वेंकटेशन यांनी घटनास्थळी पाहणी दौरा केला. त्यानंतर पालिकेच्या मुख्यालयात विशेष आढावा बैठक घेतली. यावेळी आयुक्त अनिलकुमार पवार, अतिरिक्त आयुक्त रमेश मनाळे व संजय हेरवाडे, तहसीलदार डॉ. अविनाश कोष्टी, पोलीस अधिकारी, ठेकेदार, मृतांचे कुटुंबातील सदस्य उपस्थित होते. यावेळी त्यांनी मृतांच्या वारसांसोबत संवाद साधला. घरातील कमावत्या व्यक्ती गेल्या आहेत. आमचा आधारच हरपला आहे. ठेकेदारांनी सुरक्षा साधने दिली असती तर अशी घटना घडली नसती अशा वेदना यावेळी आयोगाच्या अध्यक्षांच्या समोर त्यांनी मांडल्या.ही घडलेली घटना अत्यंत वेदनादायी असून यात जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करावी अशा सूचना आयोगाच्या अध्यक्षांनी केल्या. सुरुवातीला मदत करण्यासाठी ठेकेदाराकडून विलंब होईल असा सूर निघताच आयोगाचे अध्यक्ष, आयुक्त, तहसीलदार यांनी ठेकेदाराला धारेवर धरत वेळेत मदत त्यांच्यापर्यंत पोहचली पाहिजे असे आदेश दिले. घटनेच्या संदर्भात ठेकेदारावर गुन्हा दाखल झाला असला तरी अट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून कडक कारवाई झाली पाहिजे, असे आदेश आयोगाने पोलिसांना दिले आहेत.

# जागा अडवून ठेवणाऱ्या बेवारस वाहनांची विल्हेवाट

**लोकसत्ता वार्ताहर**



> बेवारस असलेली वाहने घेण्यासाठी कोणी आलेला नाही. यामुळे भंगार झालेली वाहने जागा अडवून आहेत. ही जागा मोकळी करण्यासाठी वाहनांची लिलाव प्रक्रिया राबवली जाणार आहे.
>
> **-संभाजी पानपट्टे,** अतिरिक्त आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका.

**भाईंदर :** मिरा-भाईंदर महापालिकेच्या मोकळ्या भूखंडावर गेल्या कित्येक वर्षांपासून जागा अडवून बसलेल्या बेवारस वाहनांची विल्हेवाट लावण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. याबाबत वाहतूक विभागाला अहवाल तयार करून लिलाव प्रक्रिया राबवण्याचे आदेश आयुक्तानी दिले आहेत.

शहरात रस्त्यावर तसेच सार्वजनिक ठिकाणी अनेक बेवारस वाहने भंगार अवस्थेत राहिल्यास त्याचा वाहतुकीवर मोठा परिणाम होतो. तसेच पावसाळ्यात या वाहनांमध्ये डासांची उत्पत्ती होण्याची शक्यता अधिक असते. परिणामी आसपासच्या नागरिकांना साथीच्या आजारांचा प्रादुर्भाव होण्याचा संभव असल्याने वाहनांवर पालिकेच्या प्रभाग अधिकाऱ्यांमार्फत कारवाई केली जाते. वाहने उचलून भाईंदर येथील बाळासाहेब ठाकरे मैदानाशेजारील मोकळ्या भूखंडावर येऊन टाकली जातात. ही कारवाई गेल्या कित्येक वर्षांपासून सातत्याने सुरू असल्याने जागा वाहनांनी व्यापून गेली आहे. त्यामुळे वाहनाचा लिलाव करून ती जागा मोकळी करण्याचा निर्णय पालिका आयुक्त संजय काटकर यांनी घेतला आहे. त्यानुसार त्यांनी महापालिकेच्या वाहतूक विभागाला या वाहनांची विल्हेवाट लावण्याची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून घेण्याचे आदेश दिले आहेत. त्यानंतर थेट लिलाव प्रक्रिया करून घेण्यासाठी जाहिरात प्रसिद्ध करण्याचे सूचित केले असल्याची माहिती महापालिकेच्या वाहतूक विभागाकडून देण्यात आली आहे.

CamScanner

पुण्यनगरी पृ. पान. क्र. 6

# बलात्कारातून जन्मलेल्या मुलाची विक्री !

## ▌नालासोपाऱ्यात अल्पवयीन मुलीवर बलात्कार ▌दोनदा प्रसूती

। नालासोपारा : नालासोपाऱ्यातील अल्पवयीन मुलीवर दोन वर्षात दोनदा बलात्कार करून तिला गर्भवती करण्यात आले आहे. तिच्या पहिल्या मुलाची विक्री केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. तिच्यावर झालेल्या पहिल्या बलात्कारामुळे झालेल्या बाळाची विक्री करण्यात आली होती. याप्रकरणी आचोळे पोलिसांनी तिच्यावर बलात्कार करणाऱ्या दोन तरुणांसह रुग्णालयातील डॉक्टर, माजी नगरसेविकेसह १६ जणांवर बलात्कार, पॉक्सोसह विविध कलमांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

याप्रकरणी मिळालेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी १७ वर्षांची आहे. दोन वर्षांपूर्वी तिचे परिसरातील एका तरुणाशी प्रेमसंबंध जमले. त्यातून ती गर्भवती राहिली होती. मात्र प्रियकराने याचा इन्कार केला. त्यामुळे माजी नगरसेविकेच्या मदतीने प्रकरण मिटवण्यासाठी प्रियकराकडून ४ लाख रुपये घेतले. माजी नगरसेविका, पीडितेचे आई-वडील, मध्यस्थ आदींनी पैसे वाटून घेतले. नंतर तिची नालासोपाऱ्यातील एका रुग्णालयात प्रसूती करण्यात आली. तिचे बाळ बळजबरीने एका महिलेकडे देण्यात आले आणि त्या बाळाची विक्री करण्यात आली.

हे प्रकरण मिटवण्यासाठी पालकांनी घर बदलले. मात्र तेथेही एका तरुणाने तिच्या अज्ञानाचा फायदा घेत शरीरसंबंध प्रस्थापित केले. यावेळी अमरावती येथील एका रुग्णालयात तिने बाळाला जन्म दिला. मात्र तरुणाने तिच्याशी लग्नास नकार देऊन सोडून निघून गेला. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच पीडितेने एका महिला



सामाजिक कार्यकर्तीसह आचोळे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. याप्रकरणी आचोळे पोलिसांनी खासगी रुग्णालयाचे डॉक्टर्स, बलात्कार करणारे दोन नराधम, मुलीचे आई-वडील, माजी नगरसेविका, मुलीची विक्री करणारी महिला अशा १६ जणांविरोधात गुन्हे दाखल केले आहेत.

बलात्कार, अपहरण, नवजात बाळाचा त्याग करणे, अपहरण आदींच्या कलम ३७६, ३७६ (२) (एन) ३१७, ३६३, ३७१ तसेच बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण (पोक्सो) च्या कलम ४, ६, ७, १२, २१ सह लहान मुलांच्या ज्युवेनाईल अ‍ॅक्ट २०१५च्या कलम ७५ अन्वये हे गुन्हे दाखल करण्यात आले. मुलगी अल्पवयीन असतानाही दोन रुग्णालयांच्या डॉक्टरांनी तिची प्रसूती केली आणि पोलिसांना कळवले नसल्याने त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. मुलीच्या आई-वडिलांनी मुलगी अल्पवयीन असतानाही बाळाची विक्री करण्यास संमती दर्शवली होती म्हणून त्यांनाही आरोपी करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. आम्ही या प्रकरणात गुन्हा दाखल केला असून आता आरोपींना अटक करत आहोत. पुढील तपासात आणखी नावे समोर येण्याची शक्यता असून त्यांच्यावरही गुन्हे दाखल करून अटक करण्याची कारवाई केली जाईल, असे पोलिसांनी सांगितले.

CamScanner

सकाळ पु. पान क्र. 1

# पे ॲण्ड पार्क योजना अडचणीत

## दोन ठिकाणी नागरिकांचा कडाडून विरोध

भाईंदर, ता. ३० (बातमीदार) : उत्पन्न वाढीसाठी मिरा-भाईंदर महापालिकेने सुरू केलेली पे ॲण्ड पार्क रहिवाशांच्या विरोधामुळे अडचणीत आली आहे. परिणामी, पाचपैकी दोन ठिकाणी ही योजना सुरू होऊ शकलेली नाही. प्रशासनाने मात्र रहिवाशांची समजूत काढून काही दिवसांतच योजना सुरू करण्यात येणार असल्याचा दावा केला आहे.

मिरा-भाईंदर पालिकेची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी पे ॲण्ड पार्क योजनेद्वारे उत्पन्न वाढवण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. या योजनेतून महापालिकेला वार्षिक ८.५ कोटींचे उत्पन्न मिळण्याची अपेक्षा आहे. त्यानुसार शहराचे वाहतूक पोलिसांच्या मदतीने सर्वेक्षण करण्यात आले व प्रमुख १५ रस्त्यांची निवड करण्यात आली. मात्र, यातील बहुतांश रस्त्यांवर एकतर जलवाहिन्या अंथरण्याचे काम सुरू आहे किंवा त्याचे सिमेंट- काँक्रीटीकरण करण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे योजनेची सुरुवात करण्यासाठी १५ पैकी कोणताही अडथळा नसलेल्या पाच रस्त्यांची निवड करण्यात आली. त्यापैकी मिरा रोड भागातील तीन ठिकाणी ही योजना सध्या सुरू आहे.

भाईंदर पश्चिम येथील स्टेशन रोड आणि साठ फुटी रस्ता या दोन ठिकाणच्या रस्त्यांवर ही योजना कार्यान्वित होऊ शकलेली नाही. या दोन्ही ठिकाणी स्थानिक व व्यापाऱ्यांनी तीव्र विरोध करून योजना सुरू होऊ दिलेली नाही. इमारतीत जागा नसल्याने नाईलाजास्तव वाहने रस्त्यावर ठेवावी लागतात. त्यासाठी शुल्क का भरायचे, असा प्रश्न रहिवाशांनी प्रशासनाला केला आहे.

### १० मिनिटांसाठी शुल्क का?

दुसरीकडे रस्त्यालगत असलेल्या दुकानचालकांनीही योजनेला विरोध केला आहे. दुकानात खरेदीसाठी आलेले लोक दुचाकी घेऊन येतात व ती दुकानासमोरच रस्त्यावर उभी करतात. दुकानात त्यांचे काम १० मिनिटांचेच असते. त्यासाठी त्यांनी शुल्क का भरायचे, असा प्रश्न दुकानदार करू लागले आहेत. रहिवासी व व्यापारी यांच्या तीव्र विरोधामुळे दोन्ही ठिकाणी पे ॲण्ड पार्क सुरू होऊ शकलेली नाही.



**भाईंदर :** पार्किंग शुल्काचे फलक महापालिकेने लावले आहेत.

पे ॲण्ड पार्क योजना महापालिकेच्या उत्पन्नवाढीसाठी आहे. योजना राबविण्यासाठी रहिवासी, व्यापारी यांची समजूत काढण्यात येईल, त्याचप्रमाणे आवश्यकता भासल्यास पोलिस प्रशासनाची मदतही घेण्यात येईल. निवडणूक आचारसंहिता संपल्यानंतर दोन्ही ठिकाणी योजना कार्यान्वित केली जाईल.

**- कल्पिता पिंपळे,**
उपायुक्त, मिरा-भाईंदर महापालिका

पुढारी पु. पान क्र. 1

## तरुणाला लुटले

**पालघर :** एका १९ वर्षीय तरुणाला मारहाण करून त्याच्याकडून पैसे व मोबाईल काढून घेतल्याची घटना तुळींज पोलीस ठाणे क्षेत्रात घडली आहे. अलोक तिवारी असे त्याचे नाव असून हा तरुण शनिवारी अलायन्स रुग्णालयाच्या परिसरातून जात असताना दोन जण आले. दोघांपैकी एकाने अलोक याला पाठीमागून पकडून त्याला मारहाण केली व त्याच्या जवळून रोख व मोबाईल असा १३ हजारांचा मुद्देमाल पळवून नेला आहे. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## आठ लाखांचा मेफेड्रोन जप्त

**पालघर :** नालासोपारा पोलिसांनी ३४ वर्षीय मलिक हुसेन याच्याकडून आठ लाख ८० हजार रुपये किमतीचा मेफेद्रीन हा अमली पदार्थ जप्त केला आहे. हा अमली पदार्थ विक्रीच्या उद्देशाने हुसेन याने स्वतः जवळ बाळगला होता. नालासोपारा पोलिसांनी त्याची झडती घेतल्यानंतर हा पदार्थ त्याच्याकडे आढळल्यानंतर त्याच्यावर कारवाई करत नालासोपारा पोलिसात गुन्हा दाखल केला आहे.

## दोघींचे अपहरण

**पालघर :** विरार पोलीस ठाणे क्षेत्रातील साईनाथनगर भागातून दोन मैत्रिणींचे अपहरण झाल्याची घटना शुक्रवारी घडली आहे. दोघ्याही मैत्रिणी घरातून बाहेर पडल्यानंतर त्या घरी आल्या नाहीत. त्यामुळे नातेवाईकांनी त्यांची शोधाशोध सुरू केली. मात्र त्या सापडल्या नसल्याने मुलींना कोणीतरी आमिष दाखवून पळवून नेल्याची तक्रार आईने दिल्यानंतर शनिवारी विरार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस या प्रकरणात तपास करत आहे.

CamScanner

म.टा.पु.पान.क्र.१

# गॅसगळतीमुळे हॉटेलला आग

## नालासोपारा पूर्व येथे दुर्घटना; चार जण जखमी



सचिन हळदे

**म. टा. वृत्तसेवा, वसई**

नालासोपारा पूर्व येथे असलेल्या द्वारका हॉटेलला भीषण आग लागल्याची घटना मंगळवारी दुपारी घडली. या आगीत चार जण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तीन तासांनंतर आगीवर नियंत्रण मिळविण्यात अग्निशमन दलाला यश आले. आगीमध्ये संपूर्ण हॉटेल जळून खाक झाले आहे.

नालासोपारा पूर्वेला गटाराच्या रुंदीकरणाचे काम सुरु आहे. या कामासाठी जेसीबीने खोदकाम करण्यात येत होते. त्यावेळी येथे अचानक गॅस गळती झाली आणि मोठा स्फोट झाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. स्फोटाची तीव्रता अधिक असल्याने आजूबाजूच्या परिसरात घबराट पसरली होती. स्फोटामुळे लागलेली आग बाजूलाच असलेल्या द्वारका हॉटेलपर्यंत पोहोचली. आग हळूहळू पसरत गेल्याने संपूर्ण हॉटेल या आगीमध्ये जळून खाक झाले आहे. या घटनेची माहिती पोलिसांना व महापालिकेच्या अग्निशमन दलाला मिळताच त्यांनी घटनास्थळी दाखल होऊन आगीवर नियंत्रण मिळविण्याचे काम सुरू केले.

हॉटेलमध्ये आणि हॉटेलच्या पहिल्या मजल्यावर अडकून पडलेल्या नागरिकांना तात्काळ सुखरूप बाहेर काढण्यात आल्याचे अग्निशमन दलाने सांगितले. तसेच हॉटेलमध्ये असलेले १० सिलिंडरदेखील बाहेर काढण्यात आले. त्यानंतर अग्निशमन दलाच्या ८ टँकरच्या मदतीने तब्ल तीन तासांच्या प्रयत्नांनंतर अग्निशमन दलाला आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले आहे. अचानक लागलेल्या या आगीमुळे हॉटेलमध्ये असलेल्यांची तारांबळ उडाली. आग लागल्याचे समजताच हॉटेलमधील लोक जीव वाचविण्यासाठी हॉटेलबाहेर जाण्याचा प्रयत्न करत होते. मात्र बाहेर पडण्याच्या प्रयत्नांत आगीत चार जण आगीत भाजल्याने जखमी झाले आहेत. त्यांना उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. हॉटेलच्या समोरच सुरु असलेल्या गटाराच्या खोदकामात गुजरात कंपनीच्या गॅस वाहिनीला धक्का लागल्याने ही गॅस गळती झाली आणि स्फोट झाल्याची शक्यता असल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे.

---

“ नालासोपारा पूर्व आचोळे रोडवर असलेल्या द्वारका हॉटेलला आग लागल्याची घटना हा तपासाचा विषय आहे. मात्र कंत्राटदाराच्या निष्काळजीपणामुळे गुजरात गॅस वहिनीला धक्का लागल्याने हा अपघात झाल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे या घटनेची चौकशी करून बेजबाबदार ठेकेदार, संबंधितांवर गुन्हा दाखल करावा.

– **मनोज बारोट**, भाजप, वसई विरार जिल्हा उपाध्यक्ष

---

**नालासोपारा येथील द्वारका हॉटेलला गॅसगळतीमुळे आग लागल्याची माहिती मिळताच तात्काळ पालिकेचे अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी पोचून आगीवर नियंत्रण मिळवले. आग कशी लागली याबाबतचे कारण स्पष्ट झालेले नसून त्याबाबत माहिती घेत आहोत. जखमींची प्रकृती स्थिर असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.**

– **दिलीप पालव**, मुख्य अग्निशमन अधिकारी, वसई विरार महापालिका

CamScanner

म. टा. पु. पान क्र. १

# कचऱ्याच्या दोन वाहनांची धडक

मिरा-भाईंदर : मिरा-भाईंदर मनपाच्या दोन कचरा गाड्यांनी एकमेकांना दिलेल्या धडकेत एक जण गंभीर जखमी झाला आहे. उत्तनमध्ये सोमवारी सकाळी हा अपघात झाला. या अपघातामुळे, चालविण्याच्या स्थितीत नसलेल्या कचरागाड्यांचा मुद्दा चर्चेत आला आहे.

मिरा-भाईंदर मनपाचा उत्तन भागात कचरा प्रक्रिया प्रकल्प आहे. या प्रकल्पात सोमवारी सकाळी कचऱ्याची एक गाडी मोकळी करून परत जात असताना, समोरून भरधाव वेगाने येणाऱ्या दुसऱ्या कचरा गाडीने तिला धडक दिली. वाहनचालकाचे नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाल्याचे सांगण्यात येते. रिकाम्या असलेल्या कचरा गाडीतील वाहन मदतनीस असणारा निरंजन पाटील या अपघातात गंभीर जखमी झाला आहे. धडक देणाऱ्या वाहनचालकाविरोधात उत्तन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मनपाकडून कचरा वाहतुकीसाठी वापरासाठी अयोग्य असलेली म्हणजेच 'अनफिट' समजली जाणारी वाहने वापरली जात असल्याने हा अपघात घडल्याचे बोलले जात आहे. म्हणून अपघातग्रस्त वाहनांची प्रादेशिक परिवहन विभागाकडून तपासणी केली जाणार आहे.

# मिरा रोडच्या राममंदिरात चोरी



मिरा-भाईंदर : मिरा रोडच्या रामदेव पार्क मधील राममंदिरात रविवारी मध्यरात्री चोरी झाल्याची घटना समोर आली आहे. धातूच्या मूर्ती व दानपेटीतील रोख मंदिरातून लंपास करण्यात आली आहे. या प्रकरणी नवघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

रामदेव पार्क परिसरात एका कॉम्प्लेक्समध्ये राममंदिर आहे. या मंदिरातील तांबे व पितळ्याची भांडी, घंटा, मूर्ती व दानपेटीतील रोख रक्कम अशी २२ हजार रुपयांच्या मुद्देमालाची चोरी करण्यात झाली आहे. रविवारी मध्यरात्री ही घटना घडली असून, सोमवारी सकाळी ती मंदिराच्या पुजाऱ्यांच्या निदर्शनास आली. मंदिराच्या खिडकीची सुरक्षा जाळी वाकवून मंदिरात प्रवेश करून ही चोरी करण्यात आली आहे. या प्रकरणी मंदिराच्या पुजाऱ्यांच्या तक्रारीवरून नवघर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

CS CamScanner